**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ**
**प्रेस नोट, दिनांक ०८/०६/२०२४**

ई.लो.से. श्री. निलेश प्रकाश राउत, वय ३५ सरपंच, गट ग्रामपंचायत वरूड खेड पींपळगांव पो. करजगांव ता. दारव्हा जिल्हा यवतमाळ + ४ यांचेवर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यवतमाळ यांनी केलेल्या सापळा कारवाई बाबत

..........................................................................................................

यातील तक्रारदार श्री. खेडकर यांनी त्यांचे शेताचे पांधन रस्त्याचे काम शेतापासुन सुरू करून घेण्यासाठी, काम झाल्यानंतर बिल मंजुर करण्याकरीता मदत करण्यासाठी व रस्त्याच्या कामाच्या मध्ये कोणतीही अडचण न करणेसाठी या कामांच्या मोबदल्यात तडजोडीअंती १,५०,०००/— रुपये लाचेची मागणी करून सदर रक्कम दोन टप्प्यात पहीला टप्पा ७५,००० रूपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. तसेच श्री.रमेश कुटे, रा. वरूड खेड खाजगी ईसम यांनी सरपंच श्री.राउत व उपसरपंच श्री.मनवर यांना लाच रक्कम मिळवुन देण्याकरीता प्रोत्साहन दिले म्हणुन लाचेची मागणी केल्याची लेखी तक्रार दिली.

सदर लेखी तक्रारी वरून दिनांक ०३/०६/२०२४ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता यातील आरोपी ई.लो.से. श्री. निलेश प्रकाश राउत, वय ३५ सरपंच गट ग्रामपंचायत वरूड खेड पींपळगांव पो. करजगांव ता. दारव्हा जिल्हा यवतमाळ + ४ यांनी स्वत:करीता तक्रारदार यांचे शेताचे पांदन रस्त्याचे काम शेतापासुन सुरू करून घेण्यासाठी, काम झाल्यानंतर बिल मंजुर करण्याकरीता मदत करण्यासाठी व रस्त्याच्या कामाच्या मध्ये कोणतीही अडचण न येण्यासाठी या कामांच्या मोबदल्यात तडजोडीअंती १,५०,०००/— रुपये लाचेची मागणी करून सदर रक्कम दोन टप्प्यात पहीला टप्पा ७५,००० रूपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. वरून तसेच श्री.रमेश कुटे, रा. वरूड खेड खाजगी ईसम यांनी सरपंच श्री.राउत व उपसरपंच श्री.मनवर यांना लाच रक्कम मिळवुन देण्याकरीता प्रोत्साहन दिले.

यावरून दिनांक ०८/०६/२०२४ रोजी आयोजीत केलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी ई.लो.से. श्री. निलेश प्रकाश राउत, वय ३५ सरपंच गट ग्रामपंचायत वरूड खेड पींपळगांव पो. करजगांव ता. दारव्हा जिल्हा यवतमाळ + ४ यांनी तक्रारदार यांचे कडुन १,५०,०००/— मधुन पहीला टप्पा म्हणुन ७५,०००/— रूपये बोदेगांव ता.दारव्हा जि.यवतमाळ येथील गौरी हार्डवेअर येथील खाजगी ईसम मुकुल घनश्याम राउत यांचे मार्फतीने स्विकारले वरून ई.लो. से. श्री. निलेश प्रकाश राउत, सरपंच गट ग्रामपंचायत वरूड खेड पो. करजगांव ता. दारव्हा जिल्हा यवतमाळ + ४ यांचे विरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक १९८८ कलम ७,१२ अन्वये गुन्हा नोंद करण्याची कारवाई पोस्टे दारव्हा येथे सुरू आहे. पुढील तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.मारूती जगताप, पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री. अनिल पवार, अपर पोलीस अधीक्षक, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्री.उत्तम नामवाडे, पोलीस निरीक्षक श्री.अमित वानखडे, पोलीस निरीक्षक श्री.विनायक कारेगावकर आणि पोलीस अंमलदार अब्दुल वसिम, सचिन भोयर, सुधीर कांबळे, सुरज मेश्राम, सतिश सोनोने, भागवत पाटील व चालक फौजदार संजय कांबळे सर्व नेमणुक अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, यवतमाळ यांनी केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो यवतमाळ कार्यालयास दुरध्वनी क्रमांक ०७२३२—२४४००२ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ वर संपर्क करण्याचे आव्हान पोलीस उप—अधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, यवतमाळ यांनी केले आहे.

( अमित वानखडे )
पोलीस निरीक्षक
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, यवतमाळ